एरंडोल वार्तापत्र
दिनांक : ०७ ऑगस्ट २०२६

कासोदा येथील आर्यन इंटरनॅशनल स्कूल मध्ये सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन्न

विद्यार्थ्यांना सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी मार्गदर्शन, सायबर सुरक्षेची शपथ

कासोदा ता.एरंडोल : येथील आर्यन इंटरनॅशनल स्कूल मध्ये सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोबाईल हाताळताना सायबर फसवणूक पासून कसे सुरक्षित राहावे या बाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. व सायबर सुरक्षेची शपथ घेण्यात आली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या "सायबर सुरक्षितीसाठी सायबर शिक्षण" या उपक्रमांतर्गत कासोदा ता. एरंडोल येथील आर्यन इंटरनॅशनल स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य जितेंद्र गजरे हे उपस्थित होते. तर विद्यार्थ्यांना या सत्रात सायबर योद्धा टीना सुनील पाटील आणि दर्शना चौधरी यांनी डिजिटल युगातील वादत्या सायबर धोक्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक माहिती दिली व सायबर सुरक्षेचे महत्व अत्यंत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगितले.

मोबाईलचा सुरक्षित वापर, मज़बूत पासवर्ड तयार करणे, ओटीपी व वैयक्तिक माहिती कोणालाही शेअर न करणे, फिशिंग लिंक, बनावट सोशल मीडिया अकाउंट, ऑनलाईन गेमिंगमधील धोके, फोटो मॉर्फिंग, डिजिटल अटक, फसवणूक तसेच सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळ०जी याविष्यी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सत्राचे विशेष आकर्षण म्हणजे हेंकर मास्कचा वापर करून सादर करण्यात आलेली प्रात्यक्षिके. हेंकरच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांशी संवाद साधत ऑनलाईन फसवणूक कशी घडते, संशयास्पद लिंकवर क्लिक केल्यास काय परिणाम होउ शकतात आणि अशा परिस्थितीत स्वतःचे संरक्षण कसे करावे, हे प्रांत्यक्ष उदाहरणांद्वारे दाखविण्यात आले. या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी "सायबर सुरक्षित राहू, सुरक्षित भारत घडवू" ही शपथ घेत सुरक्षित डिजिटल नागरिक बनण्याचा संकल्प केला. प्राचार्य जितेंद्र गजरे सर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा जनजागृती कार्यक्रमांची आजच्या काळात नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले.